## प्रकरण दुसरे

## दलित साहित्याची वाटचाल व विकास

## प्रकरण दुसरे

## दलित साहित्याची वाटचाल व विकास

### 1. दलित साहित्य - मराठी साहित्यातील नवा प्रवाह :-

कोणत्याही भाषेतील जिवंत साहित्यात नित्य नवे नवे प्रवाह उदयास येतात. नित्य नव्या प्रवाहामुळे साहित्य जिवंत होते. साहित्यात चैतन्य टिकून राहते. नित्य नवे लेखकही नव्या जाणिवा घेवून उदयाला येत असतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नवनव्या जाणिवेतून लेखन होत गेल्यामुळे मराठी साहित्य समृध्द झाले आहे. ब्रिटिश राजवटीत प्रामुख्याने पांढरपेशा समाजातील मध्यवर्गीय लेखकच लेखन करीत होते असे दिसते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हे चित्र पालटत गेलेले आढळते. लिहिणे, वाचणे, आणि बोलणे हे आता विशिष्ट वर्गापुरते मर्यादित राहिलेले नाही. शिक्षणाच्या प्रसारामुळे समाजातील उपेक्षित स्तर जागे होऊ लागले व आपले अनुभव व्यक्त करण्याची ओढ समाजाच्या सर्व थरातून निर्माण होऊ लागली आहे. ही गोष्ट मराठी साहित्याच्या दृष्टीने शुभचिन्हच म्हणावे लागेल. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जे सर्वांगाने दडपले गेले, दबले गेले, शोषिले गेले होते त्यांचा स्वर, त्यांची वेदना, त्यांचा विद्रोह त्यांच्याच लेखनातून व्यक्त होत आहे. ही गोष्ट निश्चितपणे स्वागतार्ह आहे असे भालचंद्र फडके[1] यांनी मांडलेले विचार लक्षात घेतले तर मराठी साहित्यात उदयाला आलेला दलित साहित्य हा मराठी साहित्यातला नवा प्रवाह जाणून घेणे आवश्यक ठरते. या मराठी साहित्यात नव्याने जन्माला आलेल्या दलित साहित्य प्रवाहावर उलट सुलट, चांगली वाईट अशी खूपच चर्चा गेल्या वीस-बावीस वर्षात झालेली आहे. दलित साहित्याला सवता सुभा कशाला? दलित साहित्य कलात्मक आहे का? हे साहित्य कुणासाठी? असे नसते प्रश्न उपस्थित करून या नव्या साहित्य प्रवाहाकडे दुर्लक्ष करणे उचित नाही. दलित साहित्य हे कोणा परक्याचे, सूडवादाचे[2] साहित्य नाही तर ते "माणुसकी" साठी लढणा-याचे साहित्य आहे. या बाबतची सखोल चर्चा

मागील प्रकरणात केलेलीच आहे. एका विराट आंदोलनातून, दलित चळवळीतून या साहित्याचा जन्म झाला आहे.

2. **डॉ. बाबासाहेबांची धर्मांतराची घोषणा :-**

इ.स. 1920 पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हे वैचारिक आंदोलन सुरू केले होते. इ.स. 1935 मध्ये बाबासाहेबांनी धर्मांतराची घोषणा केली. इ.स. 1956 पर्यंत त्यांनी हिंदू समाजातील, सर्व थरातून सामाजिक, राजकीय व कायदेशीर दृष्टया प्रयत्न करून पाहिले पण अस्पृश्यांच्या बाबतीतील अस्पृश्य भाव नाहिसा होण्या ऐवजी वाढतच जाऊ लागला. तेव्हाच बाबासाहेबांनी धर्मांतराची घोषणा केली. येवले येथे ऑक्टोबर 1935 मध्ये डॉ. बाबासाहेबांच्या बोध्द धर्म स्वीकारासंबंधी श्री.पंडित पद्मनाभशास्त्री पालये लिहितात, "हिंदू समाजाच्या धर्मात अस्पृश्य म्हणून राहणे, भारतीय लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने, आठ कोटी जनतेच्या विकासाच्या दृष्टीने अन्याय होतो".[3]

ज्या धर्मात माणसाला माणुसकीने जवळ घेतले जात नाही. त्या धर्मात रहाण्यापेक्षा ज्या धर्मात माणुसकी शील, चारित्र्य, संघटना, शिस्त, सौजन्य यांचा सर्वव्यापी लाभ मिळेल, अशा बोध्द धर्माचा स्वीकार करणे - डॉ. आंबेडकरांना योग्य वाटते. "धर्मांतर" म्हणजे त्यांना "नवा मुक्ती मार्ग" वाटला. बाबासाहेबांनी धर्मांतराने अस्पृश्य समाजाच्या मानसिक शृंखला तोडून टाकल्या. या घटनेमुळे दलितांच्या जीवनात- "मी बुध्द आहे, मी आता माणूस आहे" याची तीव्र जाणीव झाली व ती हळूहळू वाढू लागली. दलितांनी बुध्द तत्वज्ञान जाणून घेतले. ही चळवळ वाढत गेली. आंदोलने झाली. टीकेचे प्रहार शोषित हा लढा बळावत गेला. अखिल मुंबई इलाख महार परिषद इ.स. 1936 मध्ये भरली तेव्हा धर्मांतरा विषयीची आपली भूमिका बाबासाहेबांनी मांडली. तिचा परिणाम - कोवळ्या मनाच्या संवेदनाशील तरूण लेखकावर झाला. त्या पिढीने साहित्य निर्मिती केली आहे अशा प्रकार दलित लेखकांच्या पहिल्या पिढीची वैचारिक घडण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केली आहे. प्रत्येक लेखकाने डॉ. बाबासाहेबांच्या चरणी आदरांजली वाहिली आहे. हे सांगताना भालचंद्र फडके

म्हणतात -

"आपुलिया बळे नाही मी बोलत, "बाबा" कृपावंत वाचा त्यांची"[4]
असेच जणू तुकोबाप्रमाणे त्यांना म्हणावयाचे असावे.

तात्पर्य दलित साहित्याची प्रेरणा - डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहेत, त्यांचे विचार आहेत, आणि दलित साहित्याचे स्वरूप, स्वाभाविकपणेच विद्रोह, नकार, आणि दुःख हे आहे. धर्मांतरानंतर अन्याय, छळ, वेदना, सोसणा-या वर्गातून विद्रोहाच्या ठिणग्या पेटल्या. सम्यक परिवर्तनासाठी दलित साहित्य सर्वंकस क्रांतिचा पुरस्कार करू लागले. माणूस म्हणून डावलले गेलेले सर्व हक्क दलितांना मिळावेत. या जाणिवेतून निर्माण झालेल्या "प्रमेय" नियतकालिकाच्या पहिल्या वर्षाच्या पहिल्या अंकात संपादक इ.मो. नारनवले म्हणतात, "दलित साहित्य हे दलितांच्या सामाजिकतेचा, आर्थिकतेचा, सांस्कृतिक जीवनाचा व त्यातून उद्‌भवणा-या मानसिकतेचा दलित जाणिवेतून विचार करणारे साहित्य आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे त्याचे प्रेरणास्थान आणि त्यांचे गतीशिल मानवतावादी तत्वज्ञान हा त्यांचा आदर्श। त्यात दलित जीवना विषयी अनुकंपाना ही दयेची याचना नाही. तर मानवी अधिकारांची जाणीव आहे. जीवन हे जगण्यासाठी असते. त्यात बुडून मरण्यासाठी नव्हे. याचा प्रत्यय आहे. नवा विचार, नवी मानवता प्रेरक संस्कृति नवे जीवन यासाठी धडपड आहे. मानवतेला कलंक फासणारी प्रस्थापित मूल्ये याविरुध्द बंड आहे. म्हणूनच दलितांना अनुकंपेचा विषय मानून त्यांच्या जीवनाकडे त्रयस्तांच्या भूमिकेतून पहाणारे, आजवर लिहिले गेलेले व लिहिली जाणारे तकलादू साहित्य दलित साहित्य नव्हे. स्वाभिमान हे दलित साहित्याचा बाणा आहे. यातून दलित साहित्याची वैशिष्टये काय आहेत व काय नाहीत. याची स्पष्ट कल्पना येते. आमच्या देशातील जाती एवढया खोलवर रुजल्या आहेत की, त्यांचे निर्मुलन करण्यास आमच्या देशातील, जातीतील उच्चनिच भाव इतका खोलवर रुजला आहे की, त्याचे निर्मुलन करण्यासाठी हजारो घणांचे घाव घालावे लागतील. इ.स. 1937 मध्ये डॉ.बाबासाहेबांनी हिंदी समाजवाद्यांना हा जातीचा राक्षस नष्ट करण्यासाठी दिलेला इशारा येथे लक्षात घेण्यासारख आहे. "Turn in any direction you like, cast is the monster that crosses your path. You cannot have political reform, you can

not have economic reform unless you kill this monster".

विद्रोह, दलित साहित्यातून प्रकट झाला· डॉ·बाबासाहेबांच्या जळजळीत वक्तव्यातून दलित लेखकांच्या मनाची मशागत झाली आहे· "दिवसभर काबाड कष्ट करून पोटासाठी दोन घास कसे मिळविता येतील ही विवंचना आमची रोजची सोबतीन, पण भाकरीपेक्षा माणुसकी श्रेष्ठ म्हणून आम्ही या यातायातीत पडलो कारण ठोठावलया शिवाय दरवाजे उघडत नाहीत, आणि हिसकावून घेतल्याशिवाय माणुसकीचे साधे हक्कही तुमच्या हातून सुटत नाहीत· हे डॉ·बाबासाहेबांचे शब्द खिस्ताच्या जीवनचरित्राची आठवण करून देतात· दुस-याच्या कल्याणसाठी झटणा-या खिस्ताला हालहाल करून मारले तरी खिस्ताने कोणास दोष दिला नाही· उलट खिस्ताने म्हणले , "Oh! Lord forgive them they know not what they are doing". हिंदू समाजातील प्रतिष्ठीतांना आपण दलितावर अन्याय करतो हे कसे कळले नाही· हाच विचार येथे विचारवंतांना अस्वस्थ करतो· दलित साहित्यातून व्यक्त होणारा विद्रोह वर्णव्यवस्थे विरूध्द आहे· वर्ण व्यवस्था मानणा-या धर्माविरूध्द आहे· माणुसकीचे हक्क नाकारणा-या समाजाविरूध्द आहे· दलित लेखकांचा विद्रोह दलित समाजावर होणा-या अन्यायाविरूध्द आहे· अत्याचाराविरूध्द आहे· दलित साहित्याचे हे प्रकृति । वैशिष्टय आहे· आज पांढरपेशांचे जीवन जगणा-या दलित लेखकांतही दोन धारा आहेत· त्यापैकी एकीला वाटते आपल्या गतकाळापासून मुक्त व्हावे· आपल्या मुलाबाळावर देखील त्याची छाया पडू नये· म्हणून हा वर्ग उद्योगप्रधान समाजव्यवस्थेत शोषितांचा कैवार घेणा-या वर्गाशी नाते जोडू पहाते· दलित लेखकातील दुसरी धारा अल्पसंख्य, होतकरू लेखकांची आहे· त्यांना राजकीय, सामाजिक व वाङ्मयीन चळवळीत स्थान नाही· पण ते आपले नवे व्यासपीठ उभे करीत आहेत· त्यांच्या लेखनासाठी "अस्मितादर्श" नंतर निकाय, संसद, जातक, सिंहगर्जना, प्रमेय, सुगावा इत्यादी" नियतकालिके उदयाला आली आहेत· या दुस-या धारेतील लेखक परंपरेशी नकार दर्शवतात· प्रस्थापितांशी विद्रोह व्यक्त करतात· त्यांना वेगळे जगावयाचे आहे·

या दोन धारेतून उदयाला आलेल्या लेखक, कवी, कादंबरीकार, नाटककार, आत्मकथाकार, आत्मचरित्र कथन, आदी वाड्मय प्रकारातून आपल्या भावनाधिष्ठीत

वास्तव जीवनाभूती आविष्कृत करून प्रत्ययकारी केलेल्या आहेत. या मराठीतील नवीन वाङ्मयप्रवाहाने दलितांनाच काय पण सर्व विचारवंतांना, साहित्यिकांना आणि समाज धुरीणांना अंतर्मुख केले आहे.

अपमानित जिणे येथून पुढे जगायचे नाही. असे ठामपणे सांगून माणुसकीचा माथा उन्नत करण्याची गीते, मुक्तकंठाने गाण्याची प्रतिज्ञा करणारा तरूण दलित साहित्यिक म्हणतो,

"शब्दांची पूजा करीत नाही
मी माणसासाठी आरती गातो
ज्यांच्या गावात सुर्य नाही,
त्यांच्या हातात उजेड देतो.

दलित साहित्यिकांना सर्वकस क्रांतीच लागली आहे. ही ओढ व्यक्त करताना हा दलित साहित्यिक म्हणतो,

आता तुम्हीच प्रकाशाचे पूजक व्हा,
अन क्रांतीचा जय जयकार करा
आणि अणुस्फोटाचाही झाला नसेल
असा प्रचंड स्फोट करू या
दलितांची सत्ता सा-या जगावरती स्थापू या.

दलित साहित्यिक आपल्या साहित्याकडे एक प्रभावी साधन म्हणून पहात आहेत. साहित्याकडून निरागस आनंदाची अपेक्षा करणे, त्यांना शक्य नाही. कारण हा निरागसतेचा अनुभव त्यांना कधी आलेलाच नाही. केवळ कलावादाच्या भूमिकेने साहित्याकडे पहाणे दलित लेखकांना मानवण्यासारखे नाही.

मला आनंदच देत नाही कुठली कला
सृष्टीच्या नाना लीला
मी असूच कसा शांत समतोल,
छळतात सारी शास्त्रे-पुराणे-वेदांत
गळा आवळणारे नाना धर्मपंथ.

अशा प्रकारे साहित्याच्या मुळाशी संघर्ष व क्रांतीकारक परिवर्तन या प्रेरणा असतात. त्याला एक वेगळे सामर्थ्य प्राप्त होते. एखादा ध्येयवादी लेखक जेव्हा आपल्या साहित्यात जीवनसत्व ओततो तेव्हा, त्याच्या शब्दांना शस्त्राची धार येते व ते शब्द फार मोठा परिणाम साधतात. याचा प्रत्यय डॉ. भीमराव गस्ती यांच्या प्रस्तुत दोन्ही आत्मचरित्र कथनातून येतो. "सामुदायिक आंदोलनात जन्मणा-या नव्या प्रेरणांना लेखक शब्दरूपात चिरस्थायीत्व देत असतो. विशेषतः ललित लेखकाच्या साहित्यातून या चिरस्थायी रूपातील प्रवृत्ती लोकांच्या अंतःकरणाला जावून भिडतात. त्यावर आपला खोल ठसा उमटवितात.[5] हे प्रा. गं. बा सरदारांचे विचार प्रस्तुत "बेरड व आक्रोश" या आत्मचरित्र कथनाच्या संदर्भात यथार्थ पणे लागू पडणारे आहेत.

## 3. दलित आत्मकथनाची वैशिष्टये :-

दलित साहित्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन आणि तत्वज्ञान आहे. त्यामुळे आजची आत्मकथने ही (आंबेडकरी विचार चळवळीशी अत्यंत निगडीत) आहेत. शोषितांचे दडपलेले अंतःकरण जेव्हा आक्रंदन करून उठले तेव्हा दलित कवितेचा जन्म झाल्याचा व तेथून पुढे कथा, कादंबरी, नाटक व आत्मचरित्र रूपाने हे आक्रंदन व आक्रोश साहित्य रूपाने प्रकट झाला असल्याचा वृत्तांत मागील प्रकरणात आपण पाहिलेच आहे.

अलिकडे काही वर्षात दलित लेखकांनी आपली आत्मचरित्रे लिहून स्वतः अनुभवलेल्या अनुभूती अभिव्यक्त करण्याचा जो स्तुत्य प्रयत्न केला आहे त्याला मराठी साहित्यात तोड नाही असे म्हणावे लागेल. एक तर (मराठी वाड्मय इतिहासात यापूर्वी दिग्दर्शित न झालेले आत्मनिष्ठ भावानुभाव व प्रत्यक्ष अनुभवलेले घटना व प्रसंग या आत्मचरित्र कथनातून अशा त-हेने अभिव्यक्त झाले की, या आत्मकथनानी सर्वांचे लक्ष वेधून घेतले) आणि दुसरे म्हणजे (मराठी वाड्मय इतिहासातील आत्मचरित्रपर वाड्मय प्रकारचे दालन समृध्द करण्यास) या आत्मकथनांनी हातभार लावला आहे. बंका, सोयरा, निर्मळा, कर्ममेळा या प्राचीन अस्पृश्य संतांच्या अभंगातील आत्मपर उल्लेख पारमार्थिक प्राप्तीसाठी धडपडणा-या मनाचे आक्रंदन आहे. हे निर्विवाद परंतु अस्पृश्य जातीत जन्माला आल्याची खंत या संतांनी कळत नकळत व्यक्त केली असली तरी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

त्यात सामाजिक बंडखोरीचा अंश नाही· पारमार्थिक प्राप्तीसाठी धडपडणा-या मनाचे ते आक्रंदन आहे· असे आक्रंदन मराठी संत कवी नामदेव, तुकाराम, रामदास यांच्याही अभंगातून प्रकट झाले आहे·

प्राचीन संत कवी स्पृश्य असो अगर अस्पृश्य असो हा भेदभाव त्यांच्या भक्तीभावात प्रकटीकरणात आलेला नव्हता वारकरी संप्रदायांच्या भक्तीपंथात जातगोत, धर्मपंथ विसरून ही सर्व संत मंडळी परमेश्वराच्या भेटीसाठी तळमळत होती· हाच भाव त्यांच्या रचनेतून प्रकट झालेला आढळतो· त्याचा आजच्या विद्रोह आत्मकथनाशी संबंध जोडणे उचित होणार नाही· परंतु पुढील काळातील दलित आत्मकथने पाहिल्यानंतर मागील काळातील अभंगरूपाने प्रकट झालेले आत्मोद्गार डॉ·बाबासाहेब आंबेडकरांच्या बंडखोरीचा आदिम उद्गार असले की काय। असे वाटल्यावाचून रहात नाही·

आजची दलित आत्मकथने ही आंबेडकरी विचारसरणीचा परिपाक आहेत· त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रभाव त्यावर आहे· आपले जीवन अनुभव परखडपणे आणि विमुक्तपणे मांडणे हा आरंभ प्रभावच त्याचे द्योतक आहे· आत्म जाणीव ही आंबेडकरी प्रेरणा आहे व ती सर्वच दलित आत्मकथनातून प्रकट झाली आहे· असा निर्वाळा "दलित आत्मकथन" या ग्रंथाची प्रस्तावना संपादक प्रा·चंद्रकुमार नलगे व डॉ·गंगाधर पानतावणे यांनी देवून हेही स्पष्ट केले आहे की, आत्मकथन मग ते "हकीकत" स्वरूपाचे असो की, "अक्करमाशी", "उपरा" असो की, "काटयावरची पोटं" असो- "साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून आपले जीवन अविष्कृत केले पाहिजे"· ही बाबासाहेबांची साहित्याकडे पाहण्याची दृष्टी आहे· अर्थपूर्ण जीवन अनुभव म्हणजे साहित्य अशी साहित्याची व्याख्या केली तर त्याची आशयगर्भता दलित आत्मकथनाच्या रूपाने अधिक स्पष्ट होते असेही ते स्पष्ट करतात·

## ४· आत्मचरित्र आणि आत्मकथन :-

आत्मचरित्र आणि आत्मकथन यात काही फरक आहे का याचाही येथे विचार होणे आवश्यक आहे· दलितांच्या आत्मनिवेदनाला "आत्मकथन" म्हणण्याची प्रथा आहे आणि आधुनिक मराठी चरित्र लेखन व आत्मचरित्रपर लेखन लिहिण्याची जुनी परंपरा आहे· विशेषतः येथे आत्मचरित्रापर लेखनाचा विचार केला तर आधुनिक

मराठीत आत्मचरित्र लेखनाची दिड शतकाची परंपरा असल्याचे दिसून येते· आत्मकथनपर लेखन परंपरा अगदी अलिकडची आहे· किंबहुना या आत्मकथनपर लेखन परंपरेत आयुष्य फार कमी आहे· दुसरा एक डोळ्यात भरणारा फरक म्हणजे आत्मचरित्रे ही आयुष्याच्या उतरणीला लिहिली गेली आहेत· आयुष्याच्या एका विशिष्ट वळणावर येताच मागे होवून गेलेल्या जीवनाचा इतिहास न्याहाळण्याच्या वृत्तीतून ही आत्मचरित्रे लिहिली गेली आहेत· जीवनाच्या वाटचालीत माणसाला आयुष्याच्या मावळतीला गत जीवनातील घटना, प्रसंग, व अनुभव पुन्हा आठवतात व या गतस्मृतीच्या आठवणीने त्या व्यक्तीला एक प्रकारचा पुन्हा प्रत्ययाचा आनंद मिळतो· यावरून असे म्हणता येईल की, (गतजीवनातील अनुभव व घटना नोंदण्याचा आत्मचरित्र हा एक प्रयत्न) आहे· आत्मचरित्र लिहिताना निवडलेल्या घटना, प्रसंग, त्यांचा क्रम, वास्तवता, संदर्भ आणि संस्कार या गोष्टी स्मृतिवर हवाला ठेवून लिहिलेल्या असतात·) त्यामुळे त्या किती अचूक असतील ते सांगता येत नाही· (प्रत्यक्ष घडलेले घटना, प्रसंग, व लिहिलेल्या घटना व प्रसंग यात गफलत होण्याचाही दाट संभव असतो·) कधी कधी या संदर्भात विसंवादही घडण्याची शक्यता असते· (आत्मसमर्थन, आत्मगौरव व यासारख्या गोष्टी आत्मचरित्राला घातक असतात· असे घडले तर आत्मचरित्राची विश्वासर्हता कमी होते· कारण, आत्मचरित्र म्हणजे व्यक्तित्वाचा, त्याच्या कर्तृत्वाचा निर्लेपपणे घेतलेला सत्यपूर्ण इतिहास असतो· परंतु मराठीतील बरीच आत्मचरित्रे आत्मगौरव करतात· चांगल्या गोष्टींचा आवर्जून निर्देश करतात· व्यंगावर पांघरूण घालतात व त्यामुळे व्यक्ती जशी आहे तशी समजू शकत नाही· या दोषामुळे मराठीतील बरीचशी आत्मचरित्रे एकदेशीय ठरली आहेत· आत्मचरित्रात लेखकाचा काळही लेखनात प्रतिबिंबित होतो·

आत्मचरित्र हे आत्मकथनच असते· आपल्याला काही तरी सांगण्याच्या उत्कट प्रवृत्तीतून आत्मकथन लिहिलेले असते· काहींच्या मते आत्मकथन हा वाङ्मयप्रकार चकवा देणारा असतो· आणि ते काही प्रमाणात खरेही आहे· कारण स्वतःसंबंधी स्वतः लिहिणे कठीण असते· दुस-या संबंधी - म्हणजे चरित्र लेखन करणे सोपे असते· (आत्मकथन म्हणजे एक प्रकारे स्मरण साखळीच असते·) पूर्वायुष्यात घडलेल्या घटना, हर्षखेदाचे प्रसंग व इतर विविध प्रकारच्या स्मृती आत्मचरित्र लेखकाच्या मनाच्या मुशीतून तयार होवून शब्दरूपाने प्रकट होत असतात· आत्मचरित्र कथनातील "मी" ने अनेक

स्थित्यंतरे अनुभवलेली असतात. जीवनभरच्या प्रवासात या "मी" चा प्रिय अप्रिय संस्था समाज व राजकारण यांच्याशी संबंध आलेला असतो. किती तरी या संदर्भातील आघात "मी" ने सहन केलेले असतात. या आघातालाच "संस्कार" अशी संज्ञा दिली जाते. असे प्रतिपादन या संदर्भात प्रा. चंद्रकुमार नलगे व डॉ. गंगाधर पानतावणे करतात ते खरे आहे. आत्मकथनकाराच्या लेखनात या सर्वांचे साद पडसाद उमटलेले असतात.

आत्मकथन करताना पुष्कळशा घटना प्रसंगाची नोंद करताना आत्मकथनकाराला स्मरणावर विसंबून रहावे लागते आणि त्यामुळे सत्याचा अपलाप होणे संभवनीय असते. त्याचप्रमाणे स्वतःबद्दल लिहिताना आत्मगौरव होणे स्वाभाविक असते. आपले चांगले तेवढे सांगण्याची व वाईट असेल ते टाळण्याची माणसाची वृत्ती असते. आपले आयुष्य सुखा समाधानाचे आहे असे विचार मांडून आत्मवंचनाही आत्मचरित्रकार टाळत असतो. व आपण दोषमुक्त असल्याचे प्रतिपादन करीत असतो. तात्पर्य सत्याचा अपलाप, आत्मतृप्तीचा दोष, आत्मवंचना हे दोष आत्मचरित्रपर वाङ्मयात घडण्याची शक्यता आढळते. आत्मचरित्रे ही आयुष्याच्या मावळतीला लिहिली गेलेली आहेत. तर आत्मकथने हा एखादा अपवाद सोडला तर आयुष्याच्या ऐन उमेदीच्या काळात लिहिली गेली आहेत व लिहिली जात आहेत. येथे वयाचा घटकाबरोबर वृत्ती विशेषाचा घटकही लक्षात घेणे आवश्यक आहे. प्रौढत्व अधिक स्थिर व संयमी तर तारूण्य हे अधिक अवखळ व चंचल असते. त्यामुळे आपल्या जीवनातील विसंवाद, विषमतेचे चटके, लादलेली गुलामी, अन्याय, जुलूम याविरूध्द तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करणे स्वाभाविक ठरते. क्रांतिकारक विचार व बंडखोर मन त्यातून प्रकट होत असते. इतिहास हा वर्तमान व भूतकाळ या दोन्ही काळातील अनुभव जमेस धरून भविष्य काळाकडे नजर ठेवून तो वागत असतो. त्यामुळे व्यक्तिमत्वाच्या जडण व घडणीवर व त्याच्या लेखन आशयावार व अभिव्यक्तीवरही याचा परिणाम होतो.

आत्मचरित्रकार केवळ इतिहासातील घटना, प्रसंगाचे, हर्षामर्षाचे, सुख दुःखाचे प्रसंग चित्रित करतो तर आत्मकथनकार इतिहासाच्या पार्श्वभूमीवर वर्तमानाशी संवाद साधतो व त्याबरोबर भविष्यासंबंधीही भाकित करीत असतो. कारण वर्तमानात त्याची

वाटचाल सुरू असते· भविष्यकाळ त्याच्या पुढयात असतो· तात्पर्य आत्मचरित्रकार हा स्थिर जीवनाचे चित्रण करीत असतो तर आत्मकथनकार हा आपले अनुभव कथन करीत असतो· आणि पुढेही करणार असतो· हा आत्मकथनाचा प्रवाह चालू असतो· त्याला गतिशीलता असतते· घडणा-या घटनांशी त्याचा संबंध असतो· एखादा अपवाद सोडला तर आत्मचरित्रकार मध्यमवर्गीय जीवनाचे चित्र रंगवित असतात· त्यामुळे मध्यमवर्गीय समाजाचे ते प्रतिनिधी आहेत· तर आत्मकथनकार हे उपेक्षितांचे नाकारलेल्या समाजाचे किंबहुना अस्पृश्य समाजाचे प्रतिनिधी आहेत· हे आत्मकथनकार वेगवेगळ्या अस्पृश्य समजल्या गेलेल्या जातीतून आलेले आहेत· त्यामुळे त्यांनी मांडलेले अनुभव, त्यांचे जीवन वेगळे आहे· त्यांच्या जीवनाचे पदर वेगवेगळे आहेत· पण त्या सर्वांची इतिहासाविषयीची दृष्टीमात्र एक आहे· आपला इतिहास शोषितांचा आहे, दु:खितांचा, पिडितांचा आहे· याची त्याला जाणीव आहे· अस्पृश्यता, अन्याय, गुलामगिरी आणि दारिद्रय हे आपल्यावर लादले गेले याची त्याला चीड आहे· धर्माचा आधार घेवून होत गेलेला अन्याय त्याला सहन होत नाही· म्हणून तो हा इतिहास नाकारतो· धर्म मार्तंडाचा व सनातन्यांचा तो उपहास करतो· "हे सांस्कृतिक दु:ख, मानवी जीवनाचा अनावर उद्‌गार असल्यामुळे ते आत्मकथनाचे आशयद्रव्य ठरले आहे· पीडिक व पीडित, शोषक आणि शोषित यांच्यातील संबंधाचा तो भेदक सत्यार्थ आहे·" [6] तात्पर्य हेच की, - दलित आत्मकथनाला असलेला सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक संदर्भ हा त्याचा एक अविभाज्य भाग झाला आहे हे निश्चित·

व्यक्तीजीवन हे संदर्भ सापेक्ष असते· व्यक्तीजीवनावर त्याचा कसा परिणाम झाला हे महत्वाचे ठरते· आत्मचरित्रकार असो अगर आत्मकथनकार असो त्याचे आत्मकथन हे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृति संदर्भाच्या मुशीतून तयार झालेल्या मनाचा अविष्कार असतो व या संदर्भांना इतिहास वर्णनाचे रूप येवून देण्याची दखल घेतलीच पाहिजे· या लेखनामध्ये लेखकाने इतिहासकाराची भूमिका घेऊ नये· बहुसंख्य आत्मचरित्रे इतिहास लेखनाच्या आहारी जातात· व त्याच्या लेखनाचे संदर्भ इतिहास व समाजशास्त्राशी निगडीत रहातात व अशा लेखनाला विषयाचे स्वरूप येते व त्याचे वाड्‌मयीन मूल्य कमी होत रहाते· आत्मकथनातून येणा-या या संदर्भातून दृगोचर लेखकाचे मन झीरपले

पाहिजे· त्यातून अंतःस्फोट झाला पाहिजे· आत्मकथनातून येणारे संदर्भ व त्यातून व्यक्त होणारे मन हे अखंड सालळीच असते· आत्मसामर्थ्य व अंतःसामर्थ्य हेच आत्मकथन काराचे व्यक्तीत्व असते· पूर्वजीवनाकडे तटस्थपणे पहाण्याचा त्याची मनोवस्था या लेखनाला तयार झालेली असली पाहिजे· आत्मकथन व्यक्ती मना बरोबर समूह मनाचा अविष्कार घडतो· आत्मकथनात आपखीही एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे आणि ती म्हणजे आत्मकथनात व्यक्ती मनाबरोबर समाज मनाचेही दर्शन घडते· उदा· "मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे" मधील माधव "मिटलेली कवाडे मधील" मुक्ता, "अंतःस्फोट" मधील कुमूद, "आठवणीचे पक्षी" मधील प्रल्हाद, "गावकी" मधील रूस्तूम या सर्वांमधून त्यांच्या मनाचे ताणतणावच दृगोचर झालेले आहेत· भारतीय समाज व्यवस्थेशी खोलवर रुजलेल्या जातीभेद, अंधश्रध्दा, अज्ञान, रूढीप्रियता, श्रेष्ठ व कनिष्ठता या प्रश्नांनी मूकवादीवर झालेल्या समूह मनाचे ही येथे दर्शन घडते· या संदर्भातील "तराळ-अंतराळ" मधील प्रास्ताविकांत मांडलेले शंकरराव खरातांचे मनोगत आपणास या संदर्भात हाच विचार करायला लावतो· ते म्हणतात, "वास्तविक ही माझ्या जीवनाची कथा आहे· पण त्याचबरोबर ही एक स्टोरी ऑफ दी अनटचेबल आहे· माझ्याबरोबर माझ्या समाजाची ही कथा आहे· एका व्यक्तीच्या, एका समाजाच्या, एका गावाच्या मानसिक, वैचारिक व सामाजिक जीवनात घडत आलेल्या चाललेल्या विकासाची ही कथा आहे·"[7]

लेखकाच्या स्वतःच्या भाव भावना, वेदना विचार तो ज्या समाजात जन्मला त्या समाजाने त्याच्यावर केलेले अन्याय, अत्याचार, त्याचा केलेला छळ याचेही स्पष्ट चित्रण करीत असतो· उदा· "कुस्ती" मध्ये विजय शिरसट, यांनी व "बलुतं" मध्ये दया पवार यांनी आपल्या स्वतःच्या समाजातील व्यंगाचे परखड दर्शन घडविले आहे· सत्यदर्शनाचे एवढे भेदक चित्र इतर कोणत्याच मराठी आत्मचरित्रात फारसे आढळत नाही· अशा स्वरूपाची चित्रणे कधी कधी विकृत मनोवृत्तीकडेही वळण्याची शक्यता नाकारता येत नाही· आत्मकथनातील प्रादेशिकतेच्या खुणाही दलित आत्मकथनातून जाणवतात· उदा· त्या त्या भागातील स्त्री-पुरूष ती ती प्रादेशिक वैशिष्टये होवून आत्मकथनातून अवतीर्ण झालेली आहेत· त्यांची भाषाही त्या त्या प्रदेशाचे वेगळेपण स्पष्ट करते· उदा· "गावकी", "आठवणीचे पक्षी", मध्ये मराठवाडी भाषा आहे·

"हकिकत व जटायू" मध्ये व-हाडी भाषेचा प्रत्यय येतो· "मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे" मध्ये कोकणी भाषा आपले लक्ष वेधून घेते· दलित आत्मकथनातून बोली भाषांच्या लकबी व वैशिष्टयांचाही आपणास परिचय होतो· काही बोलीभाषा आपल्या निकटच्या परिचित असल्याचा प्रत्यय आत्मकथनातून येतो· विशेषतः "अक्करमाशी" मध्ये महाराष्ट्र, कर्नाटक सीमेवरील वैशिष्टयपूर्ण बोली भाषा आढळते· तर "उपरा", "आभरान", "गबाळ", "तराळ अंतराळ", इत्यादी आत्मकथनातून सातारा, सांगली भागातील बोलीभाषेची प्रचिती येते· "काटयावरची पोटं", "फांजर" मध्ये पुणे परिसरातील भाषेचा प्रत्यय येतो·

5· आत्मकथनातील जाती वैशिष्टये :-

मराठी दलित आत्मकथनातून जाती वैशिष्टये ही प्रकर्षाने जाणवतात· दलित आत्मचरित्रे ही आतापर्यंतच्या आत्मचरित्राहून वेगळा जीवनानुभव व्यक्त करणारे आहेत· महार, मांग, चांभार, कैकाडी, नंदीवाले, आदी उपेक्षित समाजातील या मंडळींचे दुःखे बहुतांशी, सारखीच आहेत· भूक आणि जात या अत्यंत महत्वाच्या दोन दुःखीत गोष्टीचा जणू त्यांना शाप आहे· न संपणारी भूक आणि सर्वांपासून लांब ठेवणारी जात यामुळे जीवनभर या मंडळींना क्रूर वागणूक मिळाली· ही मंडळी माणसे आहेत याचा जणू सर्वांना विसर पडला आहे· अन्न, वस्त्र, निवारा या तीनही गरजा त्यांना भागवता भागवता जीवनभर नाकी नव येते· सुख समाधानाचे चमचमीत जेवण कधी मिळालेच तर या मंडळींनी तुटून पडावे आणि आधाशासारखे खावून घ्यावे अशी त्यांची स्थिती होते· भयान दारिद्रय या मंडळींच्या पाचवीला पुजले आहे·

दलित आत्मचरित्रकार शिकून सवरून सुशिक्षितांच्या पंक्तीला जावून बसलेले आज दिसत आसले तरी हा अस्पृश्य म्हणून सवर्णांच्या जवळ जावूनही त्यांच्यात न मिसळणारे आणि शिकलेले म्हणून जातीबांधवापासून वेगळी समजलेली ही मंडळी जीवनभर सामाजिक वातावरणात तारेवरची कसरत करत असतात· दारू सारख्या व्यसनाचा या मंडळीवर मोठा प्रभाव आहे· भूता खेतावर यांचा फार विश्वास असतो आणि स्त्री म्हणजे एक उपभोग्य वस्तूच आहे असे ही मंडळी समजतात· दलित आत्मकथनातील उपेक्षित, रंजलेली, गांजलेली माणसे आणि विशेषता तशाच त्यांच्या स्त्रीया या आपणास

विचार करण्यास भाग पाडतात. दलित आत्मचरित्रे बरीच लिहिली गेली आहेत. सर्व आत्मचरित्रानी दलितांची दुःखे वेशीवर तर टांगलीच पण त्यांच्या स्त्रिया या आग्रणास विचार करण्यास भाग पाडतात. दलित आत्मचरित्रे बरीच लिहिली गेली आहेत. सर्व आत्मचरित्रांनी दलितांची दुःखे वेशीवर टांगलीच पण त्यांच्यावर होणा-या अन्यायास या आत्मचरित्रांनी वाचा फोडली. दलित आत्मचरित्रातून चित्रित केलेल्या त्यांच्या प्रसंग स्थळाच्या चित्रणामुळे त्या आत्मचरित्रांना प्रादेशिकताही लाभली आहे. या आत्मचरित्राची भाषा ही प्रादेशिक आहे. तसेच त्या त्या जातीची बोली भाषाही वेगळी आहे. हेही एक ठळक वैशिष्टय जाणवते.

दलित समाज हा बहुसंख्येने खेडयात रहाणारा आहे. त्यामुळे खेडवळ व ग्रामीण शब्द त्यांच्या बोली भाषेत अधिक येतात आणि ते जसे बोलतात व अनुभवतात तसेच लिहितात प्रतिष्ठितांना न मानवणारा शिवराळपणा, गावंढळपणा आणि रांगडेपणा त्यांच्या भाषेत असतो. आत्मकथनाच्या भाषेसंबंधी विचार केला तर दलितांच्या बोलीभाषेतील गोडवा काही आगळा वेगळा आहे हे सहजपणे लक्षात येते आणि त्यांच्या भाषेतील धारदार, क्रांतीकारी भाषा तर झोपलेल्यांना देखील खडबडून जागे करते. काही आत्मकथना मध्ये सर्व सामान्य, शहरी व ग्रामीण या दोन्ही भाषा आढळतात. विशेष निवेदन व वर्तने शहरी भाषेत आहे. संवाद अथवा प्रसंग अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी बोलीचा उपयोग देखील आढळतो. या त्यांच्या भाषा वैशिष्टयामुळे घटना, प्रसंग, संवाद विलक्षण उत्कट नेमके व जीवंत तर झाले आहेत. पण ते तितकेच रसरशीत व अकृत्रिम झाले आहेत. दलित साहित्यिकांनी आपल्या सरळ स्वाभाविक रांगडया भाषेने मराठी साहित्यात आपले एक स्वतंत्र दालन उघडले आहे. या संदर्भात दलित आत्मकथनाच्या ग्रंथाच्या संपादकाचे उद्‌गार अचूक व दलित साहित्याच्या भाषेविषयी आशावाद वाढविणारे आहेत. ते म्हणतात,

"बोलीतील असंख्य नवे शब्द पहिल्यांदाच मराठी वाचकांना परिचित होत आहेत. त्यामुळे मराठीचा शब्दकोश अधिक श्रीमंत व समृध्द होणार आहे।" [8]

"दलित साहित्यात शिवींचा प्रांत चांगला समृध्द व संपन्न असा आढळतो. दलित साहित्यातील नवेनवे वाक्प्रचार, म्हणी, यांचा दलितांच्या जीवनाशी अधिक

तेशी व्यवहाराशी निकटचा संबंध असतो. त्यामुळे दलित साहित्यातील शिवी हा एक सांस्कृतिक आविष्कार आहे. सांस्कृतिक व सामाजिक जीवनाचा दस्तऐवज"[9] म्हणून शिवीला दलित वाङ्मयात अन्योन्य साधारण स्थान आहे असे विचार मांडले जात आहेत. दलित साहित्यातील या सर्व वैशिष्टयांचा विचार करता दलित आत्मकथनांचा हा वाङ्मयीन दृष्टीने जेवढा महत्वाचा आहे तेवढाच समाजशास्त्र, मानव वंशशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, भाषाशास्त्र, अर्थशास्त्र दृष्टीकोनातून होईल. तर दलित आत्मकथनाचे सामर्थ्य अधिक बलवत्तर ठरेल यात शंका नाही. आत्मचरित्र आत्मकथन की, आत्मचरित्रात्मक कादंबरी, आत्मकथनात्मक कादंबरी या वाङ्मय प्रकारांचा विचार केला तर एकमेकापासून हे भिन्न आहेत. हे त्यांच्या भिन्न भिन्न घटकावरून लक्षात येते. आत्मचरित्रे व आत्मकथन ही कादंबरी होऊ शकणार नाही. या दोन वाङ्मयप्रकारातील एक मुद्दा लक्षात घेतला तरी यातील घाटाची भिन्नता लक्षात येते. आत्मचरित्रात व आत्मकथनात सत्याचा अपलाप चालत नाही आणि कादंबरीत जीवनसत्याला कल्पिताची डूब देवून सत्याचा आभास निर्माण करीत असते. कादंबरीत कल्पकतेचा साज असतो. वास्तव घटनेलाच साज चढविलेला असतो व त्यातून कादंबरीकाराची सर्जनक्षमता प्रतित होते. आत्मचरित्र व आत्मकथनात व्यक्ती आणि त्याचे जीवन हे जसे असते तसे वास्तव स्वरूपात गाडलेले असते. कादंबरीतील कल्पितांचे जग मोठे असते. तर आत्मकथनात व्यक्तीचे सत्य जीवन मांडलेले असते. यावरून आत्मकथा ही कादंबरी नाही. तसेच आत्मचरित्र ही कांदबरी नाही. काही जण आत्मकथनाला आत्मकथनात्मक कादंबरी व आत्मचरित्राला आत्मचरित्रात्मक कादंबरी असे समजतात ते बरोबर नाही. असे शब्द जोडले तर ते विसंवादी वाटतात. एकादा आत्मचरित्रकार अथवा आत्मकथनकार आपल्या जीवनाचा वृत्तांत एखादया कुशल कादंबरीकाराच्या शैलीने चित्रित करतो किंवा जीवनातील नाटय् अचूकपणे टिपू शकेल. पण सर्वांनाच हे कौशल्य जमेल असते नाही. म्हणून आत्मचरित्र किंवा आत्मकथा हे शब्द प्रयोग या लेखनप्रकाराचा आशय प्रकट करतात. दलित आत्मचरित्रकथन ही दलितात्मक कथा नव्हे. हेही लक्षात ठेवले पाहिजे. कथनाला सातत्याचे (Continuing Process) वैशिष्टय असते. तर कथेला ते नसते. कथेला शेवट असतो. ती कुठेतरी थांबते. आत्मकथनात तसे होत नाही. त्याचा प्रवास पुढे चालूच असतो. या सर्व गोष्टी विचारात घेतल्या तर दलित आत्मकथन

असे संबोधने यथार्थ व अर्थपूर्ण आहे· या दृष्टीने डॉ·भीमराव गस्ती यांच्या "बेरड व आक्रोश" याचा विचार केला तर ही दोन्हीही एकाच्या व्यक्तिच्या जीवनाच्या पूर्वार्धाचे व उत्तरार्धाचे कथन आहे यात शंका नाही·

आजपर्यंत लिहिलेल्या दलित आत्मकथनपर वाड्.मयाने स्वतःच्या वास्तव जीवनाचे प्रभावी कथन करून मराठी दलित आत्मचरित्रपर वाड्मयात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे· तसेच या वाड्.मयात एक नवा प्रवाह निर्माण करून आत्मचरित्रात्मक वाड्.मयाला एक नवी दिशा दिली आहे· डॉ·ना·मा· निमगडे, सौ·कांबळे, डॉ·निलकांत चव्हाण, प्रा· वैजनाथ कळसे, आत्माराम राठोड, डॉ·भीमराव गस्ती यांचे लेखनही आत्मकथनपर वाड्.मयात मोलाची भर घालीत आहे· "बेरड व आक्रोश" डॉ· भीमराव गस्ती यांच्या या दलित आत्मकथनांचा वाड्.मयीन दृष्टीने अभ्यास करत असताना समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय, राज्यशास्त्रीय, इतिहास, भाषा शास्त्रीय, अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्याचा संशोधनाचा उद्‌देश आहे· तसेच या ग्रंथाचे संशोधनात्मक चिकित्सक दृष्टीने विवेचन करून या दोन आत्मकथनातील जीवन अनुभवाचे सामर्थ्य आजमावता येईल असा विश्वास वाटतो व या आत्मविश्वासाने हा अभ्यास परपूर्ण करण्याचा हा प्रयत्न आहे· साहित्य आणि समाज जीवन यांचा कसा अन्योन्य संबंध असतो हेही येथे दाखवून देण्याचा प्रांजळ प्रयत्न केला आहे आणि म्हणून तिसरे प्रकरण साहित्य व समाज जीवन या विषयावर लिहिले आहे·

## 6· साहित्य आणि समाज जीवन :-

### साहित्य निर्मिती :-

साहित्य आणि मानवी जीवन यांचा अन्योन्य संबंध आहे· साहित्य ही एक थोर कलारूपशक्ती आहे· मानवी जीवन हेच तिचे उगमस्थान आहे· एखाद्या अस्सल कलाकृतीतून त्या काळाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते· मानवी जीवनाला आकार देण्याचे कामही साहित्य करीत असते· कलाकृती हे व्यक्तीगत प्रतिभेचे स्फुरण असले तरी त्याच्या व्यक्तीत्वाच्या आविष्काराबरोबर त्याच्या कला निर्मितीवर सामाजिकतेचाही परिणाम होत असतो· कितीही मोठा साहित्यिक अथवा प्रज्ञावंत असला तरी अखेर तो समाजातला एक घटकच असतो· त्याच्या व्यक्तीत्वाची घडण समाज निरपेक्ष कधीच नसते· त्याच्या व्यक्तीत्वाची घडण आणि त्याच्या कलेचा

आविष्कार हा सामाजिक जीवनामधूनच होत असतो म्हणूनच साहित्य व समाजजीवन यांचा अन्योन्य संबंध लक्षात घ्यावा लागतो·

मानवी जीवन हा साहित्याचा मुख्य विषय आहे· अर्थातच माणसाच्या मनातील चांगले, वाईट, शांतीचे आणि क्रांतीचे विचार आणि विकार हे त्यांच्या साहित्यात प्रगट होत · जीवनात त्याला येणारे अनुभव प्रसंगी त्याला जाणवणारी असाहयताही साहित्यात प्रगट होते· साहित्यिक ही हा एक कलावंत असतो· कलावंताचे व्यक्तिमत्व त्याच्या सभोवतालचे वातावरण आणि मानवी जीवन यांच्या त्रिवेणी संगमातूनच साहित्याची निर्मिती होत असते· व्यक्ती, समाज व मानवी जीवन यांचा संबंध अतिशय निकटचा असल्यामुळे त्याचे सरमिसळ प्रतिबिंब साहित्यात उमटते· आजपर्यंतच्या साहित्यात वाचकाला याची प्रचिती येते· तशीच दलित साहित्यही याची प्रचिती आणून देते· याचे अत्यंत प्रभावी उदाहरण म्हणजे अलिकडे लिहिलेली "मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे" मधील "माधव", "मिटलेली कवाडे" मधील "मुक्ता", "अंतःस्फोट" मधील कुमुद, "आठवणींचे पक्षी" मधील प्रल्हाद, "गावकी" मधील रूस्तुम, "बेरड" मधील डॉ·भीमराव व "आक्रोश" मधील त्याचे नातेवाईक व त्यांचा समाज येथे केलेल्या आत्मकथनातील या व्यक्तीबरोबर त्यांच्या समाजाची सुख-दुःखे, आशा - आकांक्षा, ताण - तणाव यांचे विराट रूपच त्यातून व्यक्त होते· भारतीय समाज व्यवस्थेच्या तळाशी दृढमूळ झालेला जातीभेद, अंधश्रध्दा, अज्ञान, रूढीपरंपरा, श्रेष्ठ कनिष्ठता या प्रश्नांनी बधीर झालेल्या प्रचंड मानीवी समूहाचे येथे दर्शन घडते·

लेखकाच्या व्यक्तीगत संस्काराबरोबर त्याच्या काळातील सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंबही त्याच्या साहित्यकृतीत उमटते· हरिभाऊ आपटे यांची "मी" व "पण लक्षात कोण घेतो" या कादंब-यातून आपणाला तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसते· देवलांचे "शारदानाटक", कोल्हटकरांचे "गुप्त मंजूष", खाडीलकरांचे "कीचक वध", अत्रे यांचा "उद्याचा संसार", रांगणेकरांचे "कुलवधू" यामध्ये ही त्या त्या काळाचे सामाजिक पर्यावरणाचे प्रतिबिंब उमटलेले दिसते·

शोषितांच्या आयुष्याचे चित्रण करणे हे दलित साहित्याचे मुख्य ध्येय असते· म्हणूनच अस्पृश्य, भटक्या व बहिष्कृत समाजाचे जीवन यात आले आहे· त्यांच्या

भाव भावनेला दलित साहित्यात स्थान मिळाले आहे· त्यांच्या अंतरिक मनातील वर्षानुवर्षे कोंडलेल्या, दबलेल्या भावना दलित साहित्यातून प्रकट झालेल्या आहेत· युगानुयुगे दलितांच्या वाटयाला आलेले दैन्य, दारिद्रय, दुःख, वेदना, दलित साहित्याच्या विविध वाङ्मय प्रकारातून व्यक्त झाल्या आहेत· अनेक दलित आत्मकथनातून याचे प्रत्यंतर येते· भटक्या अस्थीर जमातीमध्ये जन्मलेले लक्ष्मण गायकवाड यांनी "उचल्या" हे आत्मकथन आपले व आपल्या समाजांच्या व्यथांचे, दुरावस्थांचे हृदयद्रावक वास्तव चित्रण केले आहे· गेल्या तीस पस्तीस वर्षामध्ये मराठी साहित्यात अशा प्रकारचे साहित्य निर्माण होत आहे· दुःख व दैन्य अवस्थेत पिढयांनपिढयानी, युगानुयुगे जगणाच्या थरातून अशा स्वरूपाचे बिकट जीवन जगण्याचा प्रामाणिक आविष्कार अलिकडच्या आत्मकथा-नातून प्रकट होत आहे· त्यातील काही साहित्य कृती जागतिक कीर्तीच्या ठरल्या आहेत·

माधव कोंडविलकर यांचे "मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे" या आत्मवृत्ताने वाचकाला अंतर्मुख केले आहे· दलित माणूस जगण्यासाठी धडपडतो आहे· दैन्य, दारिद्रय आणि उद्वेग यांनी कसे घेरले आहे याचा आत्मकथनातून प्रत्यय येतो· या पृथ्वीवर मनुष्य जात अवतरली तेव्हापासून दोन लाख वर्षाचा काळ अस्वस्थाचा होता· त्यानंतरचा मानव समाज स्थीर झाला· तरी सुध्दा सामाजिक लोकशाही निर्माण करण्यात माणसाला अपयशच आले आहे· व या अपयशाचे चित्र आमच्या भारतदेशामध्ये अधिक स्पष्टपणे दिसते· भारतीय समाज सामाजिक विषमतेचे दुःख पिढयान पिढया भोगीत आहे· हे चित्र नव मराठी साहित्यात अधिक स्पष्टपणे चित्रित झाले आहे· विशेषतः दलित साहित्यातील आत्मकथनातून हे जीवन अधिक ठळकपणे आपल्यापुढे मांडले गेले आहे· विशेषतः दलितांच्या जीवनातील दुःखाला वाचा फोडण्याचे काम महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ·बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर अण्णा आदी मंडळींनी दलितांच्या अन्यायाला वाचा फोडली आहे नव मराठी साहित्यात "आठवणीचे पक्षी", "आभरान", "तराळ अंतराळ", "काटयावरची पोटं", "गबाळ" ही पुस्तके या संदर्भात ठळकपणे लक्षात येतात· नामदेव व्हटकर, शांताबाई कांबळे, बेबी कांबळे यांनी लिहिलेले आत्मपर लेखन या संदर्भात आपल्याला विसरता येत

नाही· या लेखकांनी आपल्या जीवनाचे वास्तव लेखन करून आपल्या समाजाचे उपेक्षित जीवन मांडले आहे· या सर्व आत्मकथनकारांनी उपेक्षितांच्या जीवनाचे व त्यांनी युगानुयुगेभोगलेल्यात्या व्यथा, वेदनांचे, अस्पृश्यांचे, अन्यायाचे परखड चित्रण केले आहे· त्यात डॉ·भीमराव गस्ती यांच्या "बेरड व आक्रोश" या आत्मकथनांना अधिक महत्व द्यावे लागेल· गेल्या तीस पस्तीस वर्षातील दलितांची ही आत्मवृत्ते उद्ध्वस्त आत्मवृत्ते ठरली आहेत· ही आत्मवृत्ते त्यांच्या दुःखाची आणि आपत्तीची कारणेही सांगून जातात· उदा·या उद्ध्वस्त जीवन जगणा-या विमुक्त भटक्या जातीमधील लोकांना शासन, पोलीस हे देखील एक मोठे संकट झाले आहे· शासनाच्या पोलीस यंत्रणेकडून त्यांच्या जीवनाला सुरक्षा मिळण्याऐवजी त्यांच्या जीवनात या यंत्रणेने असुरक्षाच निर्माण केली आहे·

या संदर्भात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मांडलेले विचार वस्तुस्थितीला धरून आहेत असेच म्हणावे लागेल· ते म्हणतात, "शासन व्यवस्थेतील पोलीस यंत्रणा वस्तुता अधिक सुरक्षा निर्माण करण्यासाठी अस्तित्वास आली आहे· परंतु पोलीस सुरक्षा संस्थेचा लाभ मुख्यतः सुस्थीर आर्थिक जीवन असलेल्या स्तरातील लोकांना मिळतो· विस्कळीत जाती जमातींना छळणारी अशीच पोलीस ही संस्था आहे·"[10]

विमुक्त भटक्या जातीच्या आड येणारी पोलीस ही संस्था जीवन जगण्यास कसा अडथळा निर्माण करते याचे उत्कट दर्शन या आत्मकथनातून घडते· महार, मांग, वगैरे दलित जातीतील लेखकांच्या लेखनामध्ये उच्चवर्णीय यांचा दबाव कसा जाचक आहे, हे जसे लक्षात येते तसेच मराठा, ब्राम्हण, माळी वगैरे ग्रामीण समाजातील पांढरपेशे लोक दलितांकडून सक्तीची कामे कशी करवून घेतात हे ही लक्षात येते· या सर्वांच्या दबावाखाली जगणा-या दलित जातींना समाजामध्ये मी जातीचे म्हणून स्थान आहे· प्रत्येक जातीचे वेगळे पण समाजामध्ये पक्के ठरलेले आहे· कारण जमात पंचायतीची सत्ता त्यांचे वेगळेपण शाबुत ठेवते विमुक्त भटक्या अशा शेकडो जाती आहेत· त्या महाराष्ट्रातच काय तर त्या देशभर पसरल्या आहेत· दलितांच्यामध्ये महार, मांग, चांभार अशा अस्पृश्य शेकडो जाती असून त्या गावकुसाच्या बाहेर वसलेल्या आहेत·

विमुक्त म्हणून ज्या जाती मानल्या जातात त्यांच्या व त्याभोवती तारांची कुंपणे होती· ती कुंपणे आज नाहिशी झाली आहेत· परंतु महार, मांग, चांभार इत्यादी दलित आणि उचले, पथरवट घंटीचोर, इत्यादी भटक्या आणि विमुक्त जाती यांच्यामध्येही पूर्वीपासून चालत आलेले जातीभेद अजूनही पक्के आहेत · मुसलमान, सुलतानशाहया , ब्रिटिश राजवट इत्यादी राजसत्ता या देशात आल्या आणि गेल्या· या देशावर त्यांनी जातीभेद न मानता राज्य केले· पण या देशातील कोणत्याही जातीतील जातीभेद आजतागायत मोडलेला नाही· वरपासून खालपर्यंत जातीभेद जसेच्या तसेच टिकून आहेत· याचे दर्शन आधुनिक साहित्यात विशेषतः दलित, विमुक्त व भटके यांच्या आत्मचरित्रातून घडले· या दलित आत्मकथनावरून दलितांचे जीवन दलित समाजबदलेल व त्यांना सुस्थिर असे नव जीवन लाभेल· अशी आशा वाटते यावरून असे म्हणता येईल की, "साहित्याची निर्मिती मानवी जीवनातूनच होत असल्यामुळे समाज जीवनाचे प्रतिबिंब त्यांचे अंतःस्पंदने साहित्यात उमटणे अपरिहार्य ठरते·

अशा प्रकारे साहित्य आणि समाज जीवन हे एकमेकांच्या हातात हात घालून चालत आल्याचे चित्र आजपर्यंताच्या साहित्यावरून आपल्या लक्षात येते· प्राचीन वाङ्मयावरूनही त्याचे प्रत्यंतर येते· ज्ञानेश्वरांनी देखील मराठी भाषेतून सामाजिक, विषमतेला वाचा फोडली होती· महानुभाव पंथीयांनीही मराठी ग्रंथरचना करून समाजातील विषमता सैल करण्याचा प्रयत्न केला होता· एकनाथाच्या भारूडांनीही सामाजिक विषमतेचे दर्शन घडवून समाजाभिमुखत अभिवृत्ती प्रकट केली होती·

"बुडती हे जन न देखवे डोळा"

किंवा

"आम्ही वैकुंठवासी झालो याच कारणासी" असे संत तुकारामांनी म्हटले आहे·ही सर्व उदाहरणे साहित्य आणि समाज जीवनांचा संबंध स्पष्ट करतात· इ·स· 18 व्या शताकापर्यंत मराठी साहित्यातील तत्कालीन समाजाची अध्यात्म प्रगट झालेली आढळते· तत्कालीन समाज निवृत्तीपर होता हे लक्षात येते· ब्रिटिश राजवटीत हे चित्र बदललेले दिसते· महाराष्ट्रीय समाजाच्या जीवन दृष्टीत परिवर्तन झालेले आढळते· ब्रिटीश राजवटीत महाराष्ट्रीय समाजामध्ये प्रवृत्तीपरता वाढली· लौकिकतेला प्राधान्य

आले· मराठी साहित्यही पुढे अधिका–धिक प्रवृत्तीपर होत गेले· काव्यात लौकिक विषयांना व लौकिक भावभावनांच्या आविष्काराला प्राधान्य मिळाले· आजच्या दलित आत्मकथानामधून दलितांचे लौकिक जीवनच प्रगट झाले आहे· या संदर्भात किती तरी उदाहरणे देता येतील· परंतु विस्तारभयास्तव एवढीच उदाहरणे पुरेशी आहेत·

मानवी जीवनाला सामाजिक, आर्थिक व धार्मिक असे अनेक विविध संदर्भ असतात· हेच संदर्भ साहित्यात अपरिहार्यपणे प्रगट झालेले असतात· कारण साहित्य मानवी जीवनातूनच प्रगट झालेले असते·

## संदर्भ सूची


1· महाराष्ट्र साहित्य पत्रिका,
प्रा·गं·बा· सरदार,
मुखपृष्ठा मागील पान,
आक्टोबर, डिसेंबर 1979
संपादक - प्रा· डॉ· आनंद यादव,
म·स· परिषद, पुणे - 30

2· दलित साहित्य : वेदना व विद्रोह,
भालचंद्र फडके,
प्रस्तावना पान क्र· 9
प्रथम आवृत्ती, डिसेंबर - 1977,
श्रीविद्या प्रकाशन, 250 शनिवार पेठ, पुणे - 30

3· दलित साहित्य : वेदना विद्रोह,
भालचंद्र फडके,
प्रस्तावना पान क्र· 10
प्रथम आवृत्ती, डिसेंबर 1977
श्रीविद्या प्रकाशन, 250 शनिवार पेठ, पुणे - 30

4· दलित साहित्य : वेदना व विद्रोह,
भालचंद्र फडके,
नागपूर येथील धर्मांतरानंतर केलेले भाषण,
दि· 14/10/1956, पान क्र· 10, 14
प्रथम आवृत्ती, डिसेंबर 1977
श्रीविद्या प्रकाशन, 250 शनिवार पेठ, पुणे - 30


12853

5· दलित साहित्य : वेदना व विद्रोह,
भालचंद्र फडके,
नागपूर येथील धर्मांतरानंतर केलेले भाषण,
दि· 14/10/1956, पान क्र· 217
प्रथम आवृत्ती, डिसेंबर 1977
श्रीविद्या प्रकाशन, 250 शनिवार पेठ, पुणे - 30·

6· तराळ - अंतराळ
शंकरराव खरात
प्रस्तावना
प्रथम आवृत्ती 1981
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - 30·

7· तराळ - अंतराळ,
शंकरराव खरात,
प्रस्तावना
प्रथम आवृत्ती - 1981
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - 30

8· महाराष्ट्रातील सामाजिक विचार मंथन,
संपादक - प्रा· चंद्रकुमार नलगे,
प्रकरण 12 वे, "परिवर्तन" पान क्र· 75
प्रथम आवृत्ती , 14 नोव्हेंबर 1989
सुरेश पब्लिश - सुरेश एजन्सी, पुणे ·

9· आधुनिक मराठी वाङ्मय दर्शन (1800 ते 1975) स
संपादक प्रा·देसाई व प्रा· लिमये, पान क्र· 232
तिसरी आवृत्ती, जानेवारी 1993·

10· आधुनिक मराठी वाड्मय दर्शन §1800 ते 1975§ स
संपादक : प्रा· देसाई व प्रा· लिमये, पान क्र· 233,
तिसरी आवृत्ती, जानेवारी 1993·